
पर्यावरणीय
समस्या
संपादक
डॉ. वसंत सातपुते
डॉ. सुनिता टेंगसे
डॉ. मुकुंदराज पाटील

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani

ISBN: 978-81-944856-9-8

**पर्यावरणीय समस्या** | डॉ. वसंत सातपुते,डॉ. सुनिता टेंगसे,डॉ. मुकुंदराज पाटील

Paryavarniy Samasya | Eds. - Dr.Vasant Satpute, Dr Sunita Tengse, Dr Mukundraj Patil

© *संपादक*

**प्रकाशक**
डॉ. कल्याण गांगर्डे,
न्यू मॅन पब्लिकेशन,परभणी- ४३१४०१
मोबा. ८३२९०००७३२
Email : nmpublication@gmail.com
Web: www.newmanpublication.com

**मुद्रक**
स्नेहल प्रिंटर्स अंड बुक बायंडर्स, परभणी
मोबा. ९७३०७२१३९३

**मुखपृष्ठ**
डॉ. कल्याण गांगर्डे, परभणी

**अक्षरजुळणी**
स्नेहल प्रिंटर्स अंड बुक बायंडर्स, परभणी

**प्रथमावृत्ती : २०२०**

**मूल्य. ₹ २९९/-**

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth, Dist. Parbhani

२२.जागतिक तापमान वाढ :कारणे,परिणाम व उपाययोजना /
**जयदीप सोळूंके** १०९
२३.प्रदुषण : प्रकार, कारणे, परिणाम आणि उपाय / **नरसिंग आ.पवार** ११६
२४.व्यावसायीक पर्यावरण काळाची गरज / **बी. आर शिंदे** १२१
२५.व्यवसायावर पर्यावरणाचे परिणाम करणारे घटक
**पवार बी. एस** १२४
२६.पर्यावरण जनजागृती काळाची गरज /**अंभुरे एस. डी.** १२८
२७.ध्वनिप्रदूषण परिणाम आणि उपाय / **मानसी स. सरदेशपांडे** १३२
२८.जागतिक तापमान वाढीचा कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम /
**शिवकुमार के. पांचाळ** १३५
२९.घनकचरा व्यवस्थापनातुन पर्यावरण संवर्धन / **सुनिता आ. टेंगसे** १३९
३०.पर्यावरण शिक्षण आणि त्याची आवश्यकता
**दिपक द. जोगडे, ए. के. फाजगे , ए. पी. बर्वे** १४४
३१.प्रदूषण: प्रकार, कारणे, परिणाम / **वसंत पां. सरवदे** १५०
३२.शाश्वत विकासातून पर्यावरण संवर्धन / **अशोक का. जाधव** १५४
३३.जलप्रदूषण आणि आरोग्य /**एस.जी. अन्सारी** १६०
३४.आंतरराष्टीय पर्यावरणीय वाटाघाटी / **आंधळे बी व्ही** १६३
३५.ध्वनी प्रदुषण : कारणे, परिणाम व उपाय / **मा. धो. कच्छवे** १६७
३६.औष्णिक विदयुत प्रकल्प आणि पर्यावरण /*सुरेवाड एस.जी* १७२
३७.पर्यावरण संवर्धन काळाची गरज /*सोमवंशी मुक्ता (गंगणे)* १७६
३८.जैवविविधतेचा एक चिकित्सक अभ्यास / **सुनंदा भद्रशेटे** १८१
३९.पर्यावरणाची हानी : एक गंभीर समस्या /*गोलेकर के.एम.* १८४
४०.मराठी साहित्यातील नैसर्गिक पर्यावरण / **श्रीहरी दा.चव्हाण** १८८
४१.21 वी सदी की कविता में महानगरिय,पर्यावरणीय विमर्श /
**दिग्विजय टेंगसे** १९२
४२.वाङ्मयीन पर्यावरण / **सखाराम बा. कदम** १९९
४३.भारतीय संस्कृति एवं पर्यावरण / **व्यास सी.पी.** २०३
४४.असंतुलन का असमंजस एवं इक्कीसवीं सदी /कुलकर्णी वनिता २०६
४५.पर्यावरणावर प्रदुषणचे होणारे परिणाम /
**जी.एन.सोनटक्के, एस.एस. गव्हाणे** २१०

Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

४२

# वाङ्मयीन पर्यावरण

**सखाराम बाबाराव कदम**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ

फ्रेंच इतिहासकार व साहित्य समीक्षक असलेल्या हिप्पोलीत ॲडॉल्फ तेन ने साहित्याचा सामाजिक पर्यावरणाशी असलेला अनुबंध Race, Miliuea व Moment या संकल्पनांच्या आधारे स्पष्ट केला आहे. कुठल्याही साहित्याच्या निर्मितीप्रेरणा ह्या तत्कालीन सामाजिक परिस्थितीत असल्याचे त्याचे मत दिसून येते. लेखक, कवी ज्या देशात, सामाजिक परिवेशात जन्म घेतो, त्याच्याभोवती असणाऱ्या सर्वच बाबींचा त्याच्या लेखक म्हणून त्याच्या घडणीत महत्त्वाचा वाटा असतो.

त्या-त्या काळाची मागणी म्हणूनच होमर, इलियड वा भारतीय संस्कृतीत रामायण, महाभारत आदी महाकाव्ये जन्मास आली व लोकप्रिय ठरली. आज मात्र धावपळीच्या युगात मानवी जगण्यालासुद्धा एक गती आलेली असताना एवढे दीर्घ, चिंतनशील व मानवी जगण्याचा समग्र आवाका कवेत घेणारे लिखाण होणे संभवत नाही असेच म्हणावे लागते. अलिकडे आलेली 'War & peace' ही लिओ टॉलस्टॉयची रचना वा श्री.ना.पेंडसे यांची 'तुंबाडचे खोत'सारखी दीर्घ कादंबरी सुद्धा या वंश, परंपरा, प्रेरणा व काळाने प्रभावीत झाल्याचे दिसते.

लेखकाने प्रत्यक्ष जगलेले, भोगलेले प्रसंग, त्याच्या नैतिक-अनैतिक धारणा, त्याच्यासमोर आलेल्या अडचणी, गुंतागुंतीचे प्रसंग, समाजाची मानसिकता जात धर्म व परंपराचे जोखड यांच्या सरमिसळीतून त्याचा भोवताल आकारत जातो. चक्राऊन टाकणारे प्रसंग त्या-त्या लेखकाला मूलगामी बदलण्यास कारण ठरतात. यातून कुठलाही लेखक सुटत नसतो. मग तो दुष्काळाच्या भिषण आपत्तीने घडवलेला संत तुकाराम असो की महायुद्धाच्या आपत्तीने भयावह मानवी जगण्याची क्षणभंगुरता उजागर करणारा लिओ टॉलस्टॉय असो. या वाङ्मयीन पर्यावरणाचेच फलीत म्हणून यांच्याकडे पहावे लागते.

साहित्यातून मानवी मनातल्या भाव-भावना, प्रेम, क्रोध वा मत्सर, जसे अभिव्यक्त होतात. तसेच लेखकाच्या तीव्र संवेदनशिलतेतून भव्य असे काल्पनिक जग आकारले जाते. लेखकाच्या जीवनविषयक धारणा, त्याची नैतिक मूल्यांकडे बघण्याची दृष्टी यातूनच प्रचारक, उद्‌बोधक, उपदेशक वा मनोरंजक म्हणून आपण त्या-त्या लिखाणावर शिक्कामोर्तब करत असतो. कवी अनिल म्हणतात-"मीच माझ्या एककल्ली एकटा चालित गेलो । आडवाटेने पिसाट्यापरी बेहोश झालो । ना कुठे आधार ना गतीला अंत होता । मात्र पायीच्या बळाला जागता आवेग होता । ना क्षिती होती कशाची मी मला उधळीत गेलो । अन् धुळींच्या लक्तरांची लाज गुंडाळून आलो । मज कळेना चालतांना दु:ख कैसे फुल झाले । अन् कुणाचे दिव्य आशीर्वाद मज घेऊन आले । अक्षरे चुरगाळिता मी अमृताचे कुंभ प्यालो । अन् उद्याच्या

Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

जीवनाची सांगता घेऊन आलो.'' साहित्य ही अशी एकट्याने एकांतातच करायची साधना असते. म्हणून स्वत:चा स्वत:शी असलेला दीर्घ झगडा ह्या शब्दरूप संवादाने उजागर होत असतो.

वाङ्मयीन पर्यावरण म्हणत असताना आपणास संत तुकारामांच्या अभंगातून 'बुडती हे जन । न देखवे डोळा' किंवा 'न देखवे डोळा । ऐसा हा आकांत । परपीडे चित्त । दु:खी होते ।' ही कणवेची दृष्टी दिसून येते. समाजातील व्यथा-वेदना ह्या संवेदनशील लेखक कवींना स्वस्थ बसू देत नसल्याची जाणिव त्यातून दृग्गोचर होते. मराठीतील दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी या साहित्यातील प्रवाहाच्या जन्माच्या मुळाशी ह्याच सामाजिक अस्थिरतेचे दर्शन होते. प्रचलित समाजव्यवस्थेला दोषरहीत करण्याचा वा बदलण्याचा प्रयत्न येथील प्रत्येक लेखक / कवी करताना दिसतो. समाजातील जातीभेद नष्ट करावेत, माणसाला माणूस म्हणूनच ओळखले जावे, विषमता नष्ट होऊन समतेवर आधारीत उभा असलेला मानवसमूह तयार व्हावा यासाठी दलित साहित्याने 'वेदन - विद्रोह - नकार' या विशेषांना अंगिकारत 'स्वातंत्र्य - समता - बंधुता व सामाजिक न्याय' या तत्त्वाचे पालन करण्यावर भर दिला. म्हणजेच साहित्याने काही एक नाकारले तरीही दुसरे तितकेच तुल्यबळ असे काहीतरी स्विकारलेले असते. साहित्याचा हा नकार वा स्वीकार असा मानवी जगण्याला समृद्ध करणाराच ठरतो वा ठरावा ही अपेक्षा असते. या सामाजिक बांधिलकीची वेगवेगळी रूपं आपणास कवी नारायण सुर्वे यांच्या कवितेतून दिसून येतात. अण्णाभाऊ साठे, नामदेव ढसाळ, बाबुराव बागूलांच्या लेखणीतून मानवमुक्ती व शोषणरहीत समाज निर्मितीचे स्वप्न पाहिल्याचे दिसते.

शेतकऱ्यांच्या जगण्याचे प्रश्न, शेतमालाचे प्रश्न, भूमीहीन, मजूर वा शेतीवर अवलंबून असणाऱ्या प्रत्येकाच्या व्यथा-वेदनांना मुखरीत करण्याचे काम ग्रामीण साहित्य चळवळीने केले. यात डॉ. आनंद यादव, भास्कर चंदनशिव, ना.धों. महानोर, इंद्रजित भालेराव, विठ्ठल वाघ यांच्या लेखणीतून साहित्याचे ग्रामीण पर्यावरण उभे राहिले. ह्या पर्यावरणाला शेती-मातीचे, गाव-खेड्याचे संदर्भ लगटून येत राहिले. शेतकऱ्याच्या दावणीचे बैल, गाय, वासरू, म्हैस, शेळी, मेंढी, कोंबडी, विहीरीतील मासे, कासव, शेतातील आखाड्यावरील कुत्रे, मांजर या जित्राबांच्या साथीने घडलेले वा घडत जाणारे मानवी जग ह्या ग्रामीण पर्यावरणाचा अपरिहार्य भाग बनले. तीव्र ग्रामीण संवेदनशिलतेतून ग्रामीण जाणिवेसह व्यक्त होणाऱ्या या माणसांनी केवळ शेती वा शेतकऱ्यांचे प्रश्नच उपस्थित केले असे नाही तर वेळोवेळी अनेक प्रश्नांची उत्तरेसुद्धा दिली. पर्याय सूचवले. यातूनच शेतमालाला हमीभाव मिळावा, शेतीला वीज तसेच पाणी उपलब्ध व्हावे, शेतकीची नवनवी अवजारे उपलब्ध व्हावी, यंत्राचे सहाय्य लाभावे या आकांक्षांचा जन्म झाल्याचे दिसून येते. हेही या ग्रामीण वाङ्मयीन पर्यावरणाचे फलीत आहे.

एकीकडे स्त्री-पुरूष समतेच्या, समानतेच्या घोषणा द्यायच्या तर दुसरीकडे पुरूषसत्ताक व्यवस्थेने पुरूषांच्या हिताचे तेवढेच लक्षात ठेवायचे हा सारा मतलबी

Late Ramesh Wa... (ACS) College
Dist. Parbhani

खेळ येथल्या स्त्रीयांच्या लक्षात यायला १९ वे शतक उजाडावे लागले. राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, आगरकर, डॉ. आंबेडकर यांच्या कार्य लेखणी व विचारांनी या स्त्री-पुरूष समानतेच्या चळवळीला बळकटी लाभली. त्यातच पश्चिमेकडील स्त्रीवादी चळवळीचा परिणाम म्हणून भारतातही स्त्रीवादी लढा हळूहळू उभारला जाऊ लागले. सिमॉन द बोव्हुआर यांच्या 'The second sex' व केट मिलेट यांच्या 'Sexual politics' या वैचारिक ग्रंथांनी स्त्रीमुक्तीची, स्त्रीवादाची वैचारिक पायाभरणी केली, त्यानंतर मराठीत विद्या बाळ, विद्युत भागवत, डॉ. अश्विनी घोंगडे यांनी स्त्रीवादी भूमिका व दृष्टीकोन घडवला. कवयित्री निरजा, शांता शेळके, सिसिलिया कार्व्हालो, प्रज्ञा दया पवार, आसावरी काकडे, वृषाली किन्हाळकर, इंदिरा संत, पद्मा गोळे रजनी परूळेकर यांनी मराठी कवितेतून स्त्रीवादी भूमिकेने काव्य लेखन करून स्त्रीवादी पर्यावरणाला उजागर केले.

बऱ्याच कथा-कादंबऱ्या वा कवितांमधून पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक, मराठी, राजकीय आशय व्यक्त होतांना दिसून येतो. साहित्याचे पौराणिक पर्यावरण महानुभाव पंथीय साहित्यातून, वारकरी संप्रदायाच्या साहित्यातून तर येतेच शिवाय 'ययाती', 'कौंतेय', 'मृत्युंजय', 'युगंधर', क्रौचवध', आदी कादंबऱ्यातून दिसून येते. तसेच 'सिता-स्वयंवर', 'रूक्मिणी-स्वयंवर', 'दशावतार', 'ययाती आणि देवयाणी', 'घाशिराम कोतवाल' ही नाटके हिंदू पुराणातील कथांवर आधारीत असून यात रामायण-महाभारतातील कथांचा समावेश केल्याचे दिसून येते यातून 'सौभद्र', 'मत्स्यगंधा', द्रौपदी', 'कच', 'कृष्ण', 'राम' आदी व्यक्तिरेखांच्या माध्यमातून पौराणिक वातावरण निर्मिती साधली आहे.

मराठीचे ऐतिहासिक पर्यावरण रणजित देसाई, ना.स. इनामदार, शिवाजी सावंत, वसंत कानेटकर, ह.ना.आपटे, विश्वास पाटील आदी लेखकांनी वस्तुनिष्ठ इतिहासाला मांडून तो-तो- काळ, ऐतिहासिक सत्याला न डावलता सृजनात्मकतेने साधल्याचे दिसून येते. 'आज्ञापत्र', 'बखर साहित्य', 'स्वामी', 'श्रीमान योगी', 'पावनखिंड', 'राऊ', 'शहेनशहा', 'इथे ओशाळला मृत्यू', 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'संभाजी' आदी नाटक-कादंबऱ्यातून ऐतिहासिक पर्यावरण येताना दिसून येते.

अरुण साधू यांच्या 'तडजोड', 'मुंबई दिनांक', रा.रं. बोराडे यांचा 'आमदार सौभाग्यवती', चंद्रकांत वानखेडे 'पुरोगामी', नागनाथ कोतापल्ले यांचा 'पराभव', 'पडघम' व 'राजधानी' आचार्य अत्रेंचे 'पराचा कावळा', 'तो मी नव्हेच' हे नाटक 'कऱ्हेचे पाणी' हे आत्मचरित्राचे खंड यातून मराठीतील राजकीय वातावरण दिसून येते. याशिवाय अनेक कवींच्या कविता या राजकीय स्थितीवर भाष्य करतात. राजकीय विडंबन विनोदाच्या अंगाने सांगून ध्येय धोरणातील विसंगती, उक्ती व कृतीतील फरक सांगून राजकीय पार्श्वभूमी उजागर करतात.

सामाजिक पर्यावरणाला उजागर करणारे लेखन महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, गो.ग. आगरकर, रानडे, डॉ. आंबेडकर, चिपळूणकर, लोकमान्य टिळक, रमाबाई रानडे, अनेक स्त्री कथाकार व कादंबरीकारांनी केल्याचे मराठी साहित्याचे अवलोकन

करताना दिसून येते. आधुनिक काळात ह.ना. आपटे, वा.म. जोशी, गडकरी सगळे दलित लेखक, कवी, आत्मकथा लेखक यांच्या लेखनीतून सामाजिक पर्यावरण उजागर होते. समाजाला लोकशाही मूल्ये,नैतिक मूल्ये शिकवून मानव्याची प्रतिष्ठापना करणे, माणूस केंद्रवर्ती मानून मानव विकासास पूरक भूमिका घेणे, तशी जीवनमूल्ये अंगिकारणे यातून ही दृष्टी व दृष्टीकोन घडत गेल्याचे दिसते. स्वातंत्र्य, समतेवर आधारलेला बंधुभाव वाढीस लावणे, सामाजिक न्यायाच्या तत्त्वांचे पालन करणे आदी उदात्त हेतूने हे सामाजिक पर्यावरण विकसीत होताना दिसून येते.

श्री.ना.पेंडसे, गो.नि. दांडेकर, रा.रं. बोराडे, उद्धव शेळके, शंकर पाटील यांनी मराठी कादंबरीत प्रादेशिक पर्यावरण उभे केले. वर्णनात्मकता प्रदेश व निसर्ग वर्णनाला अवसर देऊन प्रादेशिक जीवनवास्तवाचे चित्रण यांनी केले. लोकसंस्कृती व लोकजीवनाला प्राधान्य देणाऱ्या प्रादेशिक साहित्यामध्ये विशिष्ट प्रदेशाचे सर्वांगिन दर्शन घडवले जाते. विशिष्ट प्रदेशाचा लोकजीवनावरील प्रभाव टिपणे हे प्रादेशिक साहित्यात महत्त्वाचे मानले जाते. त्या-त्या प्रदेशातील चालीरिती, व्रतवैकल्ये, सण-उत्सव, प्रादेशिक मूल्ये यांना या प्रकारात महत्त्व प्राप्त होते. तो विशिष्ट भूभाग, निसर्ग, माणसे, त्यांच्या समजूती, चालीरिती, बोलीभाषा, दैवते यांच्या गुणविशेषांसह प्रादेशिक कादंबरी उभी राहते. प्रादेशिक कादंबरी ही प्रादेशिकतेच्या रंग, गंधांनी माखलेली असते. तसेच प्रादेशिक साहित्य हे समूहनिष्ठ असल्याने त्यातून समूहाच्या जीवनजाणिवा अभिव्यक्त होतात.

असे आहे मराठीचे वाङ्मयीन पर्यावरण.

□□□

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani